**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि २० जून २०२३**

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३८६/२०२३ भादवि ३०७,१४३,१४७,१४८,१४९,५०४,५०६,मपोकाक १३५ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १८/०६/२०२३ रोजी २०.३० वा चे सुमारास, अंबिका नगर याठिकाणी MSEB ऑफिसच्या समोर, सोलापूर बार्शी रोडवर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०६/२०२३ रोजी २३.५१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विकास ऊर्फ (पप्पु) सुरेश दोरकर, वय- २८ वर्षे, रा. गणेश नगर, बाळे, सोलापूर सध्या सिव्हील हॉस्पीटल येथील मेलवार्ड बेड नं. ६, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) समाधान सरवदे, २) किरण सरवदे, ३) बापु सरवदे, ४) सुनिल भोसले, ५) बाबा भोसले, ६) मोहन शिंदे, ७) व्यंकटेश हुल्लुर, सर्व रा. जोशी गल्ली, बाळे, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीच्या चुलत मावशीची मुले आरोपीत क्रं. १ व २ यांनी तु आमच्याकडे रागाने का पाहिले असे म्हणून आरोपीत क्रं. १ व २ यांनी रिक्षामधील लाकडाने फिर्यादीच्या डोक्यात मारुन दुखापत केली आहे. तसेच आरोपीत क्रं. ३ याने तेथे पडलेला दगड फिर्यादीच्या डोक्यात मारुन जबर दुखापत केली आहे. तसेच आरोपीत क्रं. ४,५,६ यांनी फिर्यादीस रिक्षामधुन खाली उतरवुन लाथाबुक्यांनी फिर्यादीच्या छातीत व पोटात मारहाण करुन शिवीगाळ व दमदाटी केली आहे. आरोपीत क्रं. ७ याने त्याच्या कडील ब्लेडने फिर्यादीच्या गळयावर वार करुन फिर्यादीस गंभीर जखमी केले आहे. तपास:- पोसई/ भोईटे - ७९७२११९७५१ |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३९९/२०२३ भादवि ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | जानेवारी २०२० ते दि. ०६/०७/२०२० रोजी चे दरम्यान, मु.पो.हैद्रा, ता. अक्कलकोट, जि सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०६/२०२३ रोजी १५.५१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | ऐश्वर्या रमेश शिंदे, रा. रेल्वे कॉलनी, गणेश हॉल, शनि मंदिराचे समोर, बिल्डींग, नं. ०७, रु नं. १५२, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) रमेश शिंदे- पती, २) नागप्पा शिंदे- सासरे, ३) प्रियंका शिंदे- नणंद, ४) बुधप्पा कांबळे- चुलत काका |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीस मला घर बांधायचे आहे तु तुझ्या आई वडीलांकडुन ३ लाख रुपये घेवून ये नाहितर इथे राहु नको मी बाहेर बाई ठेवलेली आहे तुला काय येत नाही तुझ्याशी कोण लगन केल असत असे म्हणून शिवीगाळ मारहाण केली आहे. त्यावर आरोपीत क्रं. २, ३ व ४ यांनी आरोपीत क्रं. १ यास समजावून न सांगता वाईट शिवकण करीत असे व तु रमेश ला सोडुन दे असे म्हणून शिवीगाळ करीत असत. दि. ०६/०७/२०२० रोजी आरोपीत क्रं. १ याने पुन्हा घर बांधण्याकरीता ३ लाख रुपये आण नाहीतर तुला मी नांदविणार नाही असे म्हणून फिर्यादीस मारहाण केली आहे. त्यावर फिर्यादीचे वडीलांनी फोन केला असता त्यांनाही ३ लाख रुपये आणुन दे नाहीतर तुझ्या मुलीला घेवून जा असे म्हणून शिवीगाळ केली आहे. म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ९२४ नदाफ - ९७३०४८११९६ |

# एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४०३/२०२३ भादवि ३८० प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १९/०६/२०२३ रोजी ००.३० वा ते ०४.३० वा चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०६/२०२३ रोजी २३.१७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | संतोष श्रीमंत वाघमारे, वय- ३५ वर्षे, रा. सुरज निवास न्यु रंगराज नगर, माया अपार्टमेंटच्या समोर, जुना विडी घरकुल हैद्राबाद रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | २८,०००/- रु एक निळया रंगाचा सॅमसंग गॅलेक्सी ए २३ मोबाईल रोख रक्कम, ५ ग्रॅमचे सोन्याची अंगठी |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे राहते घरी झोपेत असताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने घराचे कंपाऊंड वरुन गॅलरीत प्रवेश करुन व गॅलेरीतील दरवाजा अर्धवट उघडा असल्याने घरामध्ये प्रवेश करुन नमुद वर्णनाचे व किंमतीचे ऐवज फिर्यादीचे संमतीवाचून चोरी करुन घेवून गेला आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ६२५ उबाळे - ९९६७४३७८२२ |